दर रविवारी




# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ८२ वा ❑ भारतीय सौर दिनांक १८ वैशाख शके १९४८, शुक्रवार दि.०८ मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### वैभवला खेळवणे बालकामगार नियमांचे उल्लंघन नाही

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



**ज्योतिर्मय साहित्य**

वैभव सूर्यवंशीला १५ व्या वर्षी आयपीएल मध्ये खेळवणे बालकामगार नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप काही सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. राजस्थान रॉयल्स विरुद्ध एफआय आर दाखल करण्याचा इशारा देखील सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. मात्र खेळ आणि बालकामगार याच फरक आहे. बालकामगार म्हणजे १४ वर्षे खालील मुलांकडून जबरदस्तीने काम करून घेणे होय. बालकामगारांचा संबंध शारीरिक व मानसिक शोषणाशी आहे.

बालकामगार म्हणजे १४ वर्षांखालील अशा मुला-मुलींकडून पैशासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी करून घेतले जाणारे काम, जे त्यांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व शैक्षणिक विकास हिरावून घेते. हे शोषण त्यांना शाळेपासून दूर ठेवते आणि धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडते

बालकामगार आणि खेळ याचा कुठेही संबंध नाही.

भारतीय कायद्यानुसार १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवण्यास मनाई आहे तर १४ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुले विशिष्ट अटीनुसार बिगर धोकादायक क्षेत्रात काम करू शकतात मात्र क्रीडा क्षेत्रातील उपक्रमांना या कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आले आहे.

वैभव सूर्यवंशी याला व्यावसायिक क्रिकेटमध्ये (उदा. २०२६) खेळवणे हे तांत्रिकदृष्ट्या बालकामगार कायद्याचे उल्लंघन मानले जात नाही. भारतीय क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी १५ वर्षांचा असून त्याच्या सहभागावरून काही सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते, मात्र कायद्यानुसार व्यावसायिक क्रीडा प्रकारांना सामान्यतः बालकामगार या श्रेणीत धरले जात नाही.

भारताचा बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम १४ वर्षांखालील मुलांच्या कामावर बंदी घालतो. तथापि, मनोरंजन आणि क्रीडा क्षेत्रातील सहभागाला काही अटींसह सवलत देण्यात आली आहे, कारण ते मुलाच्या शिक्षणात अडथळा आणत नाहीत आणि ती एक कौशल्य विकासाची प्रक्रिया मानली जाते.

आयसीसीच्या नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी खेळाडूचे वय किमान १५ वर्षे असणे आवश्यक आहे. वैभवने २७ मार्च रोजी वयाची १५ वर्षे पूर्ण केली आहेत, त्यामुळे तो वरिष्ठ स्तरावर खेळण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरतो. तक्रार आणि वाद: कर्नाटकच्या एका कार्यकर्त्याने राजस्थान रॉयल्स विरुद्ध बालकामगार आरोपाखाली तक्रार करण्याचा इशारा दिला होता. परंतु, तज्ज्ञांच्या मते, उच्च-स्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये तरुणांचा सहभाग ही प्रतिभेला संधी देण्याची प्रक्रिया असून ती बालमजुरीमध्ये येत नाही.

मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण असून, कलम ३१ नुसार मुलांना खेळण्याचा आणि मनोरंजनाचा अधिकार आहे. व्यावसायिक स्तरावर खेळणे हे या अधिकाराचाच एक भाग म्हणून पाहिले जाते, जोपर्यंत त्यातून मुलाची पिळवणूक होत नाही.या प्रकरणाकडे आपण केवळ नियमांचे उल्लंघन म्हणून न पाहता, एका तरुण प्रतिभेला मिळालेली मोठी संधी म्हणूनही पाहू शकतो.

खेळ खेळण्यासाठी सामान्यतः वयोमर्यादेचे कोणतेही बंधन नसते. खेळ हे कोणत्याही वयात, आनंद, आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी खेळले जाऊ शकतात.

बॅडमिंटन, क्रिकेट किंवा इतर खेळ जे केवळ मनोरंजनासाठी खेळले जातात, त्यासाठी वयाची कोणतीही अट नसते. लहान मुले ते ६०+ वर्षांचे वृद्धही हे खेळ खेळू शकतात. कॉलेज स्पोर्ट्समध्ये सहभागासाठी (उदा. ) वयाची अट असू शकते. आरोग्य आणि वयोगट: योगासने, चालणे, पोहणे किंवा हलके खेळ कोणत्याही वयात फायदेशीर आहेत.ऑलिम्पिक किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वयोगटाचे नियम असू शकतात, कारण तिथे शारीरिक क्षमता आणि तंदुरुस्ती महत्त्वाची असते.

कायदेशीर आणि तांत्रिकदृष्ट्या, आयपीएलमध्ये खेळण्यासाठी कोणतीही कठोर किमान वयोमर्यादा नाही. तथापि, बीसीसीआयच्या अनुभवाच्या निकषांची पूर्तता करणारे १५ ते १८ वयोगटातील खेळाडू खेळू शकतात. वैभव सूर्यवंशीचे उदाहरण हे सिद्ध करते की, जर एखाद्या खेळाडूने देशांतर्गत स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली असेल, तर वय हा अडथळा ठरत नाही. कायद्यानुसार हा गुन्हा मानला जात नाही, कारण खेळाडू एका व्यावसायिक कराराखाली असतो, ज्यामध्ये त्याच्या शिक्षणाची आणि सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी समाविष्ट असते.

# वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य

**ज्योतिर्मय साहित्य**

आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएलमध्ये असे रत्न उदयास येते की ज्या रत्नाने संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट जगत उजळून निघाले आहे आणि हे क्रिकेट रत्न आहे अवघ्या १५ वर्षाचं आणि त्याचे नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १५ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामाच करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघ्या १५ वर्षाचा युवा खेळाडू आहे. मागील वर्षी ज्यावेळी राजस्थान रॉयल्स संघाने त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याचवेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतकी मोठी बोली का लावली असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडे मागे जावे लागेल. वैभव सूर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहारकडून १९ वर्षाखालील संघातून विणू माकड चषक क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहार कडून रणजी खेळणारा तो सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. ४ संघाने भाग घेतलेल्या या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या. त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत तडाखेबंद शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकुळ घातला. तिथे यूएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपान्त्य फेरीत श्रीलंकेविरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितले. विक्रम राठोड यांनी वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहिली आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य कोच असलेला राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशाप्रकारे त्याची राजस्थान रॉयल्स संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनौ संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला पहिल्यांदा संधी दिली. वैभव याच संधीची वाट पाहत होता.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

त्याने या संधीचे सोने करण्याचे ठरवले आणि त्याने पहिल्याच चेंडूवर शार्दुल ठाकूर सारख्या अनुभवी गोलंदाजाला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली कामगिरी केली. गुजरात विरुद्धच्या सामन्यात तर त्याने कमाल करत अवघ्या ३८ चेंडूत १०१ धावा काढत क्रिकेट विश्वाला चकित केले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमाला गवसणी घातली. तो आयपीएल स्पर्धेत सर्वात कमी वयाचा शतकवीर ठरला. इतकेच नाही तर सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा भारतीय खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावे केला. मागील वर्षी आयपीएल गाजवलेल्या वैभवने यावर्षी तर कमाल करत अनेक विक्रम आपल्या नावे केले. यावर्षीही त्याने ३६ चेंडूत शतक झळकावत इतिहास घडवला. आयपीएलमध्ये दोन शतके आणि दोन्हीही ३६ चेंडूत झळकावणारा तो एकमेव खेळाडू ठरला. वयाच्या १५ वर्षी आयपीएलमध्ये दोन शतके झळकावणाराही तो एकमेव खेळाडू आहे. केवळ आयपीएलमध्येच नाही तर मागील वर्षी झालेल्या १९ वर्षाखालील टी २० स्पर्धेतही त्याने शानदार कामगिरी केली. त्यांच्या शानदार कामगिरीने भारताने तो विश्वचषक आपल्या नावावर केला होता. आयपीएल असो की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिकेट कोणत्याही स्पर्धेत तो जितक्या निर्भीडपणे खेळतो तितक्या निर्भीडपणे खेळणारे खूप कमी खेळाडू क्रिकेट विश्वात आहे. जसप्रीत बुमरा, ट्रेंट बोल्ट, रशीद खान, जोश हेजलवूड, मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स यासारख्या जगातील दिग्गज गोलंदाजांना तो ज्या प्रकारे षटकार खेचतो ते पाहून अचंबित होते. अवघ्या १५ वर्षाच्या या खेळाडूच्या प्रेमात अवघे क्रिकेट विश्व पडले आहे. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, पॅट कमिन्स, ॲडम गिलख्रिस्ट, वासिम अक्रम, सुनील गावसकर, श्रीकांत, अनिल कुंबळे, हरभजन सिंग, नवज्योत सिंग सिद्धू, हरभजन सिंग, महेंद्र सिंग धोनी यासारख्या महान खेळाडूंनी त्याचे कौतुक केले आहे. क्रिकेटचा देव सचिन तेंडूलकर तर त्याच्या प्रेमातच पडला आहे. सचिन तेंडूलकरने वैभवच्या खेळाविषयी ट्विट केले की, वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी या सर्वांचा संगम म्हणजे वैभवची धमाकेदार खेळी. केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर जगातील अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले आहेत. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनींही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मिडिया तर त्याच्यावर फिदाच झाली आहे. त्याच्या खेळाने त्याने आपण भारतीय क्रिकेटचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब फलंदाजीने त्याच्यावर प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा!

# चर्चेतून घडवावे आपलं आयुष्य?

**ज्योतिर्मय साहित्य**

चर्चा...... चर्चा कोणत्याही विषयावर व्हायलाच हवी. कारण चर्चे तून मार्ग निघतो. तसेच जो मार्ग निघतो. तो मार्ग आपलं मार्गदर्शन करणारा ठरतो वा आपलं आयुष्य घडविणारा ठरतो.

अलिकडील काळात आत्महत्या होत आहेत. कधी शेतकरी आत्महत्या तर कधी घरगुती वादातून पती पत्नीची आत्महत्या तर कधी गुण कमी मिळाले म्हणून विद्यार्थी वर्गाची होणारी आत्महत्या तर कधी सासू सुनेच्या आत्महत्या कधी आपल्या म्हातारपणाच्या वयोवृद्ध जीवनाला कंटाळून वयोवृद्धांच्या आत्महत्या. कधी स्त्रीच्या आत्महत्या तर कधी पुरुषांच्या आत्महत्या. कधी लहान बालकांच्याही आत्महत्या तर कधी तरुणवर्गाच्या आत्महत्या.

आत्महत्या होण्याला जबाबदार आहे निराशता. निराशता ही नेहमीच जीवनात येत असते. ज्याप्रमाणे सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख येतं. तशीच निराशताही येत असते. तसं पाहिल्यास आजच्या काळात कोणताच घटक सुखी नाही. साधं दगडाचं उदाहरण घेतल्यास तोही सुखी नाही. त्यालाही उन, पाऊस, थंडी, वारा झेलावं लागतं. ज्यातून त्याचे तुकडे होतात. तसा सजीव घटकही सुखी नाही. सजीव प्राण्यांनाही दुःख नसतं असं नाही. त्यांनाही दुःख असतंच. त्यांना तर जंगलात असतांना सुरक्षीतता नसते. तेच दुःख. सरपटणाऱ्या प्राण्यांनाही दुःख असते सरपटावं लागते याचं. वृक्षवल्लींनाही दुःख असतंच. त्यांना एकाच जागेवर राहावं लागतं. इकडे तिकडे स्थलांतरीत होता



येत नाही त्याचं. ते झाडंही आत्महत्या करतंच. कधी त्याची एखादी फांदी. हे दिसतं, अचानक झाडं वाळण. यातून त्या झाडाची आत्महत्या दिसत असते. लोकं म्हणतात की त्या झाडाला कीड लागली. परंतु असं कधीकधी होत नाही. तसं माणसांनाही दुःख असतं. परंतु त्यावर आत्महत्या हा उपाय नाही. परंतु आत्महत्या घडतातच.

आत्महत्येबाबत सांगायचं झाल्यास आत्महत्या थांबवता येवू शकतात. त्या रोखताही येवू शकतात. जर आपण एखाद्या गंभीर प्रश्नांवर निराशा न बाळगता चर्चा केली तर....... आपण चार लोकांना त्याबद्दल सांगीतलं तर....... काहीजण काहीबाही बोलतात. बोलू शकतात. कारण त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. परंतु काही लोकं असेही असतात की जे उगाच बोलत नाही तर त्यावर उपायही सांगतात. चर्चेतून आत्महत्या थांबतात.

चर्चा..... चर्चा करणे हा आत्महत्या रोखण्याचा प्रभावी उपाय. त्यातून फक्त आत्महत्याच थांबवता येत नाही, तर त्या चर्चेतून बरेच मुद्दे तेही गुंतागुंतीचे क्लिष्ट असलेले मुद्दे सोडवता येतात. शिक्षकांच्या जीवनाचा विचार केल्यास चर्चेला अतिशय महत्व आहे.

चर्चेतून घरातील घरगुती वाद सोडवता येतात. आजच्या काळात घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले आहे व या घटस्फोटाच्या वाढत्या काळात पतीपत्नींमध्ये सकारात्मक चर्चा घडून आली तर बस. त्यांच्यात घटस्फोट न होता, तो थांबून त्यांचा संसार हा चांगल्याप्रकारचा होत असतो.


**अंकुश शिंगाडे**
नागपूर ९३७३३५९४५०

चर्चा...... काही चर्चा या सकारात्मक असतात तर काही चर्चा या नकारात्मक. सकारात्मक चर्चेतून चांगले मार्ग निघतात तर नकारात्मक चर्चेतून वाईट मार्ग. गत दहा वर्षापुर्वी अशाच स्वरुपाच्या चर्चा झाल्या की ज्यातून आजच्या सरकारी शिक्षकांच्या जीवनात उदासीनता आणली. लोकांनी आपली मुलं गत दहा वर्षापुर्वी वस्तीवस्तीत चर्चा करुन कॉन्व्हेंटला टाकली. त्यावेळेस कॉन्व्हेंटला नावे टाकण्याचा त्याचा ओघ कमी होता. परंतु आज वाढला. कारण वस्तीतील ज्या पालकांची मुलं कॉन्व्हेंटला जात होती. त्याची चर्चा वस्तीत व्हायची व वस्तीवस्तीत तशी चर्चा झाली की लोकं आपली मुलं कॉन्व्हेंटला टाकायला नेत असत. अशातच आज असा काळ आला की आज सगळीच मंडळी आपली मुलं कॉन्व्हेंटला टाकायला नेत आहेत. त्यांच्या मनात आज तरी गरीबी नाही. शिक्षण नाही. शिक्षणाचा दर्जा नाही. फक्त आहे, तो भव्यदिव्यपणा. ज्यातून गरिबांच्या घरच्या चुली पेटत नाहीत. परंतु मुलं शिक्षणासाठी कॉन्व्हेंटला असतात. शिवाय ते कॉन्व्हेंटचं शुल्क देतात. त्यासाठी कर्ज काढतात. त्याच कर्जात घरही चालतं. मग कर्ज वाढत जातं व असं कर्ज वाढलं की सर्रास आत्महत्या. परंतु कॉन्व्हेंटला मुलं शिकविणं बंद होत नाही. शिवाय ज्यावेळेस पैसे नसतात व आपल्या मुलांना अशावेळेस कॉन्व्हेंटमधून काढून सरकारी शाळेत जरी टाकतो म्हटलं तरी कॉन्व्हेंटच्या शाळेतील मंडळी मुलांच्या शिक्षणासाठी शाळा सोडण्याचे दाखले देत नाहीत. ते आपल्या कॉन्व्हेंटचं बाकी असलेलं शुल्क मागतात. ज्यातून मुलांचं पुढचं शिक्षण सुटतं व ती मुलं पुढे न शिकता हमाल बनतात. हे सगळं आज का घडतं? हे घडतं, काल दहा वर्षापुर्वीपासून होत आलेल्या चर्चेतून. काही काही चर्चा अशाच चालत असतात की ज्यातून अशा प्रकारच्या कृती घडत असतात समाजात.

चर्चा...... चर्चेतून एखाद्या सौभाग्यवतीचा होणारा घटस्फोट थांबवता येवू शकतो. चर्चेतून शेतकरी आत्महत्या थांबवता येवू शकतात नव्हे तर आजच्या गरीबांना, उद्या होणारं कॉन्व्हेंटपासून नुकसान कळत नाही. तेही प्रकर्षानं समजावून सांगीतलं जावू शकतं.

आजच्या काळात कालच्या पालकांच्या चर्चेतून सरकारी शाळेला समस्या निर्माण झालेली असून आज लोकं त्याच चर्चेचा प्रभाव एवढा पडलेला आहे की त्या चर्चेतून आज कॉन्व्हेंटला मुलं टाकली जात आहेत व हवाला दिला जात आहे की तिथं शिक्षण चांगलं आहे.

सरकारी शाळेत शिकविलं जात नाही. असं लोकं म्हणतात. सध्या हम दो हमारे दो म्हणत प्रत्येक पालक कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करतो. अशावेळेस आपल्या मुलांना प्रत्येक पालक आज कॉन्व्हेंटचं शिक्षण कमी पैशाचं असल्यानं शिकवू शकतो. ज्यातून सरकारी शाळेत मुलं मिळत नाहीत व सरकारी शाळा बंद होत आहेत. काही शाळा बंद पडण्याच्या कगारवर आहेत. मात्र उद्याचं संभाव्य भविष्य असं आहे की जर मुलंच सरकारी शाळेत मिळालीच नाही तर उद्या सरकारी शाळा बंद पडतील नव्हे तर सरकारला अशा शाळा चालविणे परवडणार नाही व त्या बंद कराव्या लागतील. अशावेळेस उद्या कॉन्व्हेंटच्याच शाळा सुरु राहतील व त्या शाळेचं शुल्क वाढलेलं असेल व ते अमाप वाढलेलं असेल. **(क्रमशः)**




## जात्यावरच्या ओव्या......

वाट तापली उन्हान
जसा चुलीवर तवा
नका फिरू अनवाणी
पायी पायतन ठेवा ||६३१||

वाट तापली उन्हान
पाण्याची झाली वाफ
देऊन सावली सगळ्या
झाड घाव करी माफ ||६३२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २७




ज्योतिर्मय साहित्य

या संदर्भात स्वामी विवेकानंद यांच्या बालपणातील प्रसंग अत्यंत बोलका आहे. त्यांचे बालपणीचे नाव नरेंद्र. ते अत्यंत अवखळ आणि खोडकर होते. ते झाडावर चढत. आईला असे वाटले की झाडावर चढून हा खाली पडला तर त्याला इजा होईल. त्यामुळे त्यांच्या आईने त्यांना झाडावर चढू नकोस. तिथे ब्रह्मराक्षस राहतो असे सांगितले. पण नरेंद्राने आईला विचारले, ''ब्रह्मराक्षस ? कुठे आहे तो? मला त्याला पाहायचेच आहे.?'' ब्रह्मराक्षस प्रत्यक्षात नव्हताच. आपली मनच अशा गोष्टींची निर्मिती करते. म्हणूनच भित्यापाठी ब्रह्मराक्षस असे आपण म्हणतो.



समर्थ पुढे आपल्याला एक मोठा आधार देतात

रघुनायकासारखा स्वामी आपल्या पाठीशी आहे.

राम म्हणजे केवळ एक ऐतिहासिक किंवा पौराणिक पात्र नाही, तर तो धैर्य, धर्मनिष्ठा आणि संरक्षणाचे प्रतीक आहे. वाल्यासारख्या बलाढ्याला संपवणारा, रावणासारख्या अहंकारी व्यक्तीचा नाश करणारा हा राम सज्जनांचा त्राता आहे. म्हणूनच समर्थ म्हणतात.

प्रत्यक्ष यम जरी कोपला, तरी राम तुला कधीही सोडणार नाही. तुझी उपेक्षा करणार नाही. याचा अर्थ असा नाही की की श्रीरामांना शरण जाण्यामुळे आपला मृत्यू टळणार आहे. मृत्यू तर अटळ आहे परंतु श्रीराम आपल्या पाठीशी आहेत हा विश्वास जेव्हा आपल्या मनात निर्माण होतो तेव्हा मृत्यूची भीती कमी होते. संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळते.

शेवटी, भय, आनंदी आणि धैर्याचे जीवन जगण्यासाठी समर्थांचा स्पष्ट संदेश आहे की श्रीरामावर (भगवंतावर) श्रद्धा ठेवा, धैर्य धरा आणि निर्भयपणे जगायला शिका. श्रीराम तुमच्या पाठीशी आहेतच.

स्वसंवाद : मी माझ्या आयुष्यातील समस्यांना धैर्याने सामोरे जातो का, की त्यांना घाबरून जातो?

माझी भीती वास्तव आहे की ती माझ्या मनाने निर्माण केली आहे ?


संकटांच्या वेळी मला ईश्वरावर खरोखर विश्वास वाटतो का?

माझ्या मनातील श्रद्धा आणि धैर्य वाढवण्यासाठी मी काही प्रयत्न करतो का?

(क्रमशः)




## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### अहंकार

पुढे........

आपण स्वत:ही आत्मा म्हणजे मी आहे आणि हा देह म्हणजे मला केवळ वापरावयास दिलेला एक कपडा आहे असे नेमके समजत नाही. तर हा देह म्हणजेच मी ही असत्य धारणा करून बसतो. यामुळेच तो कर्म बंधनात अडकतो.

मुळी होता मुक्त परी झाला बद्ध
घेऊनिया छंद माझे माझे

हा देह म्हणजे मी हा भाव इतका दृढ होतो की यामुळे सर्व घडणारे कर्मे तुम्ही केली असे समजतो, व ती फेडण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घेतो.

हा देहभाव म्हणजे अहंकार होय.

हा अहंकार इंद्रिया करवी कर्मे करून घेतो.

इंद्रिये गुणाधारे/ रहाटती निज व्यापारे/
ते परकर्म बलात्कारे/ अपादी जो //
185/3 ज्ञाने.

द्रव्य किंवा प्रकृतीचे तत्व कर्म तत्व आहे.

कर्माच्या क्रियेच्या सिद्धांताप्रमाणे पाप व पुण्य या दोन्ही कृत्यांना प्रेरणा (चेतना, चालना, गती) देणारी प्रकृती आहे. रक्तात ज्याप्रमाणे रंग परमाणु (गुण : रजोगुण किंवा तमोगुण) असतात तशाच प्रकारची ते गती घेतात व त्यानुसार इंद्रियातून क्रिया निर्माण होतात. अर्थात ती प्रकृती कर्त्याला "बलात एव" त्या त्या कर्माकडे ओढून नेते. जीव निमीत्त ठरतो. तो जे फळ भोगतो ते प्रकृती कडून मिळणाऱ्या प्रेरणात्मक कर्माचेच फळ असते. म्हणून पाप पुण्य रोग, भोग, जरा मरण, अमरत्व याला मूळ कारण रक्त रंग परमाणु होत.

क्रमश:.....




### जीवन-जगण्याची झुंज

माणसाने जीवनमुल्ये-नितीअनितीवर विश्वास ठेऊन आचरण केले तर दुसर्याचे दुःख समजून घेता येईल. पण आज माणसाचा समाजावर विश्वास असो नसो, बाजाराचा मार्केटचा ग्राहकावर विश्वास आहे. कारण आपण आज एआय व डिजीटलच्या जमान्यात येऊन पोहचलो आहोत आणि शहरी जीवनात बंदिस्त झालो आहोत, असे मला वाटते, अर्थात हा ज्याचा त्याचा वैयक्तिक विचार आहे. पण त्यामुळे दुःखाचा ऊदासीनतेचा बाजार झाला आहे! जग आता बाजारपेठ तंत्रज्ञान व त्यांचे फायदे जास्त पाहात आहे! भावना शुन्यता व दैन्य वाढत आहे, पण कोणी भूक, आरोग्य, निरक्षरता, बेकारी व शांत जीवन यावर ठोस ऊपाय सापडत नाही! दर दशकात गरिबी वाढून तांत्रिकपणा वाढला. जे तंत्रज्ञान शिखरावर व आभासीच एआय खरं वास्तविक वाटत आहे. पैसे कमावणे, नविन नाते व सामान खरेदी करणे, हेच जीवन असल्याचे दिसते व हेच सुख वाटत आहे. म्हणून जीवन मरणाची झुंज देणारे मध्यमवर्गीय लोक चंद्र मंगळावर कसे जातील!! यालाच जीवनचक्र म्हणतात. असो, आनंदी आनंद गडे.. गुड डे गुड मार्निंग स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे वाचत राहा!

## सुविचार - प्रकाश



प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

आळसामुळे विद्या प्राप्त होत नाही
विद्या नसल्याने धन प्राप्त होत नाही
धन असल्याने मित्र प्राप्त होत नाही
मित्र नसल्याने सुख प्राप्त होत नाही

नियतीने आपला टाईम कधी सेट केला आहे
एंट्री आणि एक्झिट कधीच ठरली आहे
टाईम मॅनेजमेंट मात्र आपल्या हाती आहे
जय पराजय त्यानेच निश्चित होणार आहे




## शरीराला आवश्यक असणाऱ्या खनिजा विषयी

ज्योतिर्मय साहित्य

कॅल्शिअम कशात असतं?

शेंगदाणे, तीळ, दूध, खोबरं, मुळा, कोबी. ज्वारी, राजगिरा, खरबूज, खजूर.

कमतरतेमुळे काय होतं?

हृदयरोग, ऑस्टियोपोरोसिस, दंतरोग, केस गळणे.

कार्य काय असतं?

शरीरातील सर्वात मुख्य खनिजं असून ते हाडांची मजबुती आणि शरीराच्या निर्मितीसाठी आवश्यक असतं.

लोह कशात असतं?

खजूर, अंजीर, मनुका, सफरचंद, डाळिंब, पालक, सीताफळ, उस, बोर, मध, पपई आणि मेथी.

कमतरतेमुळे काय होतं?

शरीरात रक्ताची कमतरता भासते. अशक्तपणा, कावीळ किंवा पोटात मुरडा येतो.

कार्य काय असतं?

शरीराच्या वाढीसाठी अतिशय आवश्यक असते.

सोडिअम कशात असतं?

मीठ, पाणी, बटाटा, आलं, लसूण, कांदा, मिरची, पालक, सफरचंद, कारलं.

कमतरतेमुळे काय होतं?

रक्तदाबाशी निगडित समस्या, निद्रानाश, अंगदुखी, अपचन, मूळव्याधीसारखे आजार, मोतीबिंदू, बहिरेपणा, हात अणि पाय कडक होणे.

कार्य काय असतं?

शरीराला आवश्यक असणारी पाचक रसायनाची निर्मिती करतात, त्याचप्रमाणे शरीरात होणारा गॅस नष्ट होतो.

आयोडिन कशात असतं?

शिंघाडा, काकडी, कोबी, राजगिरा, शतावरी, मीठ आणि लसूण.

कमतरतेमुळे काय होतं?

थायरॉइडची समस्या, केस गळणे, डिप्रेशन किंवा बैचेनी येणे.

कार्य काय असतं?

शरीरात उत्पन्न होणाऱ्या विषारी पदार्थापासून मेंदूला बचावण्याचं काम करतो.

पोटॅशिअम कशात असतं? सर्व प्रकारची धान्य, डाळ, संत्र, अननस, केळं, बटाटा, लिंबू, बदाम.)

कमतरतेमुळे काय होतं?

ॲसिडिटी, त्वचेवर सुरकुत्या किंवा मुरुमं येणं, त्वचा रोग, केस पिकणे.

कार्य काय असतं?

शरीरात तंतू आणि यकृत यांना सुरळत ठेवण्याचं कार्य करतं.

फॉस्फरस कशात असतं?

दूध, पनीर, डाळी, कांदा, टोमॅटो, गाजर, जांभळं, पेरू, काजू, बदाम, बाजरी आणि चणे.

कमतरतेमुळे काय होतं?

ऑस्टिओपोरोसिस, गतिमंद होणे, मानसिक थकवा, दंत रोग.

कार्य काय असतं?

मेंदूला ताजंतवानं ठेवण्याचं काम हे खनिजं करतं.

सिलिकॉन कशात असतं?

गहू, पालक, तांदूळ, कोबी, काकडी, मध,

कमतरतेमुळे काय होतं?

कॅन्सर, त्वचारोग, बहिरेपणा, केस गळणे.

कार्य काय असतं?

जननेंद्रियांची कार्यक्षमता वाढवून शरीरातील तंतूना मजबूत करतात.

मॅग्नेशिअम कशात असतं? बाजरी, बीट, खजूर, सोयाबीन, दूध, लीची, कारलं.

कमतरतेमुळे काय होतं?

उदास होणे, आळस येणे, तणाव असणे, झोप न लागणे, बैचेनी, सोरायसिस, फोडं, नपुंसकता किंवा वांझपणा. (क्रमशः)

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

विषय :- उन्हाळा

सुरु झाला आता
कडक उन्हाळा पहा
गर्मीने सर्व परेशान
थंड हवा आहे
सर्वांसाठी आवश्यक म्हणूनी
वृक्षलागवड करावी छान

उन्हाळ्यात अंगास झोंबे
गरम वारा फार
घामाच्या धारा वाहती
जेवन जात नाही
नुसते पाणी प्यावे
बेचैन सर्व होती

# ‘‘स्त्री भ्रूण हत्या’’ सामाजिक समस्या


**ज्योतिर्मय साहित्य**

‘‘जन्मा आधीच केला गर्भात ‘‘ती‘‘ चा अंत ना ऐकला ‘‘ती‘‘ चा आकांत

स्त्री भ्रूण हत्या ही खूप मोठी आणि एक गंभीर सामाजिक, मानसिक, वैचारिक, कौटुंबिक समस्या आहे. एकानंतर एक मुली झाल्या की, वंशाचा दिवा हवाच. असं म्हणत म्हणत मुलाची वाट पाहिली जाते. मुलाच्या हट्टापायी त्या मातेची पिळवणूक व छळ केला जातो. मुलगा होईल की मुलगी या विचाराने कुटुंबातील सर्व चिंतीत असतात. मग विचार प्रवाह सुरु होतो. जर, मुलगी झाली तर तिचे लग्न, हुंडा केवळ या दोन गोष्टींमुळे तिला, तिच्या जन्माला नाकारलं जातं. आणि एका निष्पाप, सुंदर, नाजूक, इवल्याशा, कोवळ्या जीवाला त्या कळीला मातेच्या संम्मतीविना उदरातच मारलं जातं. किंवा तीचा जन्म झाल्यानंतर त्या नाजूक जीवाला काट्याकुट्यात, ओसाड रानी-वनी, रस्त्यावर, कचरा कुंडीत किंवा एखाद्याच्या दारात नेऊन ठेवलं जातं. किती हे पाप? पुरुषप्रधान समाजात मुली वा महिलांना असणारे दुय्यम स्थान आणि मुलगा मुलगी भेद स्त्री भ्रूण हत्येसाठी हेच एकमेव कारण आहे.

स्त्री भ्रूण हत्यामुळे समाजात लिंग भेद मोठ्या प्रमाणात होतो आहे. हे विदारक चित्र आपण उघड्या डोळ्यांनी बघत आहोत. कुठल्याही प्रश्नांवर आवाज न उठवता. म्हणूनच आज महिलांच्या बाबतीत जीवघेण्या समस्या पावलोपावली निर्माण होत आहेत वा घडत आहेत. मोकाट स्वैराचाराने. आणि या स्वैराचारामुळे महिलांच्या बाबतीत हिंसेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रसवपूर्व लिंग निदान यामुळे मुलीला, तिच्या जन्माला नाकारले वा रोख लावली जाते. मुलगी आहे म्हटले की, तिचा गळा घोटला जातो. पण, हे कायद्याने गुन्हा आहे. मुलींच्या जन्माबाबत समाजात जोपर्यंत सामाजिक मानसिकता बदलली जाणार नाही किंवा जागरूकता पसरवली जाणार नाही तोपर्यंत ही समस्या तोंड आ वासूनच राहणार. म्हणून सर्वप्रथम कौटुंबिक विचार पद्धती बदलणे गरजेचे आहे. सामाजिक जागरूकतेमुळेच या समस्येला आळा घालता येईल.

कांही समाजामध्ये मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी, घराण्याचा अंश वाढविणारा या दृष्टीने मुलाकडे पाहिले जाते. मुलगी म्हटले की, भलामोठा हुंडा ही आर्थिक समस्या ओझं बनते. आणि गर्भपात, उदरातच तिची हत्या करून हे ओझे कायमसाठी डोक्यावरून खाली उतरवले जाते. कित्येक गरीब कुटुंबामध्ये मुलींचा जन्म, त्यांचे पालनपोषण आणि लग्नासाठी लागणारा खर्च या गोष्टींना खूप मोठी समस्या समजली जाते. आपण पाहतो की, कांही ठिकाणी पितृसत्ता




उच्च असते. पितृसत्ताक मानसिकता असलेल्या कुटुंबामध्ये मुलगा मुलगी भेदभाव आणि महिला हिंसा ह्या सदर आहेत.

स्त्री भ्रूण हत्येमुळे लिंग प्रमाण गंभीर रित्या बिघडले आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे बऱ्याच जाती-धर्मात जाणवणारा मुलींचा तुटवडा. यामुळे वधू संकट ही समस्या निर्माण झाली आहे. या निर्माण झालेल्या समस्येमुळे कांही जाती-धर्मात वराकडील मंडळी वधू मंडळींना पैसे देऊन वधू आणत आहेत. वधू नव्हे तर वस्तू विकत घेतल्यासम परिस्थिती निर्माण होत आहे. स्त्री भ्रूण हत्या म्हणजे महिलां प्रति हिंसेचे रूप आहे. आणि महिलांच्या अधिकारांचे कठोर उल्लंघन ही आहे. प्रसव पूर्व लिंग निदान, गर्भ पातासाठी मातेला मजबूर करणे यामुळे मातेच्या स्वास्थ्यावर, आरोग्यावर, मनावर वाईट परिणाम व आघात होत आहे. मात्र कुटुंबातील लोक या परिणामांची तमा बाळगत नाहीत. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी सामाजिक स्तरावर भाषणे, व्याख्यान, नाटक सादर केली जातात. तसेच, मीडिया मार्फत जागरूकतेचे अभियान राबविले जातात.

समाजात महिलांना पुरुषांबरोबर सम्मान व समान दर्जा देऊन सशक्त बनविणे फार गरजेचे आहे. यामुळे स्त्री भ्रूण हत्येला आळा घालण्यास मदत होईल. आंध्र प्रदेश, राजस्थान मधील पिपलांत्री सारख्या गावांमध्ये मुलींच्या जन्माचा उत्सव साजरा केला जातो. तसेच, जन्मलेल्या मुलींच्या नावे सरकारतर्फे बँकेत धनराशी जमा केली जाते. सरकारतर्फे धनराशी, वस्तू, भविष्यातिल शैक्षणिक खर्च, लग्नाचा



सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899

खर्च दिला जातो. मुलींच्या जन्मावर अशा प्रभावी योजना राबविल्या जात आहेत. १९९४ चा प्रसव पूर्व गर्भ लिंग निदान प्रतिबंध कायदा अस्तित्वात आला. आणि प्रसव पूर्व लिंग निदान करण्यास आळा घालण्यात आला.

आजच्या २१व्या शतकातही मुलींचा जन्म खूप मोठा अभिशाप समजला जातो. स्त्री अस्तित्वाची निच पद्धतीने अवहेलना व अपमान केला जातो. ‘‘ मुलगी म्हणजे परक्याचं धन तिचा आपल्याला, आपल्या घराला काई फायदा होणार न्हाई. इतं शिकून, सवरून परक्याचं घर उजागर करणार ‘‘ या विचाराने मुलींना निट वाढवलं जात नाही. निट पालनपोषण केलं जात नाही. बाई गं तु परक्याचं धन हेच वाक्य ऐकत बिचाऱ्या मुली लहानाच्या मोठ्या होत असतात. काळ बदलला, विज्ञानाने भरगच्च प्रगती केली पण मुलींच्या जन्माबाबत लोकांची मानसिकता चुकीचाच आणि विकृत विचार करते.


होईल ‘‘ती‘‘ जिजाऊ सावित्री नका लावू ‘‘ती ‘‘च्या जन्मास कात्री...

***

## ‘‘झाडीचा खाजा’’ या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा व कविसंमेलनाचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

कुरखेडा - गाव बोलीभाषेत लिहिलेल्या कवितांचा सन्मान आधी गावातच व्हावा आणि समाजात तिची दूरवर ओळख व्हावी या उद्देशाने मूळ गाव देऊळगाव येतील व सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांनी झाडीबोली भाषेत लिहिलेल्या ‘‘झाडीचा खाजा‘‘ या झाडीबोली काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाचे आयोजन दि.१७, रविवारला महादेवगड अरततोंडी, गट ग्रामपंचायतच्या सभागृहात सकाळी ११ वाजता केले आहे. या काव्यसंग्रहाचे प्रकाशन जेष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ.परशुराम खुणे यांच्या शुभहस्ते होणार आहे. या प्रकाशन सोहळ्याला उद्घाटक म्हणून नाट्यलेखक, नाट्यकलावंत, दिग्दर्शक सदानंद बोरकर, अध्यक्ष सरपंच विजय तुलावी गट ग्रामपंचायत अरततोंडी, दीपप्रज्वलन प्रसिद्ध साहित्यिक, आदिवासी सामाजिक कार्यकर्त्या कुसुमताई अलाम गडचिरोली, भाष्यकार डॉ. धनराज खानोलकर ३३ व्या झाडीबोली संमेलनाचे अध्यक्ष काटली, भाष्यकार, समीक्षक, नाट्यकलावंत प्रा.डॉ.राजकुमार मुसणे, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय आष्टी, विशेष अतिथी म्हणून वासुदेव कोल्हे ग्रामकोष समीती अध्यक्ष देऊळगाव, ग्रंथमित्र भाऊराव पत्रे प्रमुख कार्यवाह नागपूर विभाग ग्रंथालय संघ नागपूर, व प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या




सत्रात दुपारी २ वाजता कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘‘कविसंमेलनाध्यक्ष‘‘ जेष्ठ हास्यकवी एकनाथ बुध्दे विसोरा हे उपस्थित राहणार आहेत. सर्व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाडीचा खाजा या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा पार पडणार आहे. कविसंमेलनात सहभागी होणाऱ्या इच्छूक कवींनी दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा ७८२१८१६४८५ या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांनी कळवले आहे.

## दहावीचा निकाल आज दुपारी एक वाजता

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फ ब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल उद्या शुक्रवार दि. ८ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी दिली आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेचा निकाल पुढील अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येईल.

अधिकृत संकेतस्थळे

1) https://results.digilocker.gov.in
2) https://mahahsscboard.in
3) https://sscresult.mkcl.org
4) https://results.targetpublications.org
5) https://results.navneet.com
6) https://www.tv9marathi.com
7) https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-ssc–10-results

## व्याकरणाचे दडपण नको, भाषेतील गंमत ओळखा, अभिजात मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आपली जबाबदारी- डॉ. नीलिमा गुंडी

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - ज्येष्ठ लेखिका डॉ. नीलिमा गुंडी यांनी म्हटले आहे की, भाषेच्या व्याकरणाचे दडपण न घेता त्यातील गंमती समजून घेऊन भाषा शिकता आली पाहिजे. पुढील पिढीपर्यंत अभिजात मराठी भाषा पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे साहित्य प्रसार आणि वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी बालकुमार शब्दोत्सव आयोजित करण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये खास मुलांसाठी हा महोत्सव ३१ मे पर्यंत सुरू राहणार आहे. डॉ. गुंडी यांनी या महोत्सवाचे उद्घाटन केले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

अक्षरधारा बुक गॅलरी येथील कुसुमाग्रज वाचक कट्ट्यावर हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध बालसाहित्यकार एकनाथ आव्हाड आणि अक्षरधारा बुक गॅलरीच्या संचालक रसिका राठिवडेकर उपस्थित होत्या.

महोत्सवाच्या उद्घाटनानंतर विश्वास प्रकाशन पुणेतर्फे प्रकाशित डॉ. नीलिमा गुंडी यांच्या अर्थाचा पत्ता सापडला या पुस्तकाचे प्रकाशन झाले. तसेच, एकनाथ आव्हाड यांच्या गंमत गाणी आणि मजेदार कोडी या पुस्तकांचेही प्रकाशन करण्यात आले. यानंतर मुलांसाठी गट्टी मराठीशी हा विशेष कार्यक्रमही सादर करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. नीलिमा गुंडी यांनी सांगितले की, आपण जन्माला आल्यापासून भाषा आपसूक शिकत असतो. लहान मुले ऐकून आणि निरीक्षण करून भाषा आत्मसात करतात. व्यक्तिमत्त्व विकासात विविध शिबिरे




जशी महत्त्वाची असतात, तसेच वाचनही व्यक्तिमत्त्व विकासात भर घालते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. भाषा शिकण्यासाठी कानही तल्लख असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

एकनाथ आव्हाड यांनी यावेळी सांगितले की, मुलांना एकदा पुस्तकाची गोडी लागली की ते आपोआप मोबाईल गेम्ससारख्या इतर आकर्षणांपासून दूर राहतील. मुलांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केल्यास त्यांना ते नक्कीच भावते, असा त्यांचा स्वतःचा अनुभव आहे. मुले पुस्तकांपर्यंत येत नसतील, तर आपण पुस्तके मुलांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. मुलांचे भावविश्व समजून घेऊन पुस्तकरूपी बाग फुलवून ते अधिक समृद्ध केले पाहिजे. पुस्तकांच्या माध्यमातून होणारे संस्कार चिरकाल टिकणारे असतात, असेही आव्हाड म्हणाले.




(लघुकथा)

## आई तू कशी आहेस.....



स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74098

भाग 5 पुढे......

मुलांना काय आवडते त्यांची यादी मनात करत ती सामान पाहू लागली. पंधरा दिवसात दोन्ही मुले सहकुटुंब येणार होती. मनाची मरगळ दूर सारुन ती उठली. हळुच तिने तिच्या आवडीचे काम करायला सुरुवात केली. पहिले म्हणजे तिने टेपरेकाकॉर्ड चालू करुन तिच्या आवडीची गाणी लावली, ज्यात तिचे घरकुल आणि तिचा पूर्ण संसार आनंदी असेल अशी गाणी ऐकत ती कामाला लागली. मनावरचा ताण दूर झाला. स्वच्छ हातपाय, तोंड धुवून ती देव्हार्याजवळ आली. देवाजवळ दिवा लावून,हळद कुंकू फुले वाहिली, साखर ठेवली. मुलांना सुखरुप आण म्हणून प्रार्थना केली.

उदयापासून तयारीला लागायचे म्हणून कामाला लागली, आवराआवर सुरु झाली. गावाला काय काय न्यावे लागेल याची यादी मनात करतच तिने जेवणासाठी वाल डाळिंब्याची खिचडी, सोलकढी आणि पापड असा बेत केला, वांग्याचे भरीत असा बेत केला.

आणि नकळत तिला हसू आणि आसू आले. कारणही तसेच होते, नेहमीच ती स्वयंपाक करताना प्रत्येकाच्या आवडीचा एक पदार्थ करायची म्हणजे सगळेच खुश व्हायचे आजही तिने तेच ठरवले, थोड्या वेळाने स्वयंपाक झाल्यावर तिने चौघांची चार पाने घेतली. आणि डायनिंग टेबलजवळ गेली, सर्वांना हाक मारु लागली. कोणाचाच आवाज येईना ती इथे तिथे पाहू लागली, सहज तिचे लक्ष हा हॉलमधील एकत्र फॅमिली फोटोकडे गेले, चौघेही मिस्किल हसत होते. ती मनातच ओशाळली, इथे कुणीच नव्हते. समिधा भानावर आली. तिने देवाला नैवेद्य दाखवला व जेवून घेतले. सर्व आवराआवर झाल्यावर थोडा वेळ शांत पडावे म्हणून दिवाणावर पहुडली.

थोड्या वेळाने उठली व आता तिने वही पेन घेऊन गावाला नेण्यासाठी लागणार्या वस्तूंची यादी करायला घेतली.

रोज नव्याने आठवणार्या वस्तूंची भर पडत होती.

एकदाचे पंधरा दिवस संपले, आता मुले येण्याची वेळ जवळ आली, तेवढ्यात प्रभासचा फोन आला, आई आम्ही अर्ध्या तासात पोहोचतोय. तिने औक्षणाची तयारी केली, सर्व आवरुन ती दाराजवळ आली.

फोन आला यावेळी प्रसादचा फोन होता.

"आई तू कशी आहेस?"

पुन्हा एकदा हे शब्द कानावर पडताच समिधाचे हृदय आनंदाने भरुन आले.

"आई, आम्ही दोन दिवसात येतच आहोत. आपल्या सर्वांना गावाला जायचे आहे, आ आ ऽ आंबे खायला, खूप मज्जा करायची आहे, प्रिन्सला पोहायला शिकवायचे आहे. आम्ही येतच आहोत."


समिधाला भरुन पावले, मनातल्या मनात ती ओशाळली, तिला उगाचच वाटत होते, आपली मुले आपल्याला विसरली की, काय? पण दोन्ही मुलांचे फोन ऐकून तिला भरुन आले तिच्या हृदयाच्या गाभार्यात शब्द घुमू लागले "आई तू कशी आहेस?"

समाप्त ■ ■

## प्रात:स्मरणीय आदर्श सच्चरित्र 'द्रौपदी'



लेखिका- डॉ. मीना श्रीवास्तव





आगे.........

महाभारत में वस्त्रहरण के कठिनतम प्रसंग में भी अपनी मेधावी बुद्धिमत्ता का प्रदर्शन करते हुए द्रौपदी ने भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य एवं धृतराष्ट्र जैसे दिग्गजों को भरी राज्यसभा में कई प्रश्न पूछकर निरुत्तर किया था| एक उदाहरण पर्याप्त है; "महाराज युधिष्ठिर ने मुझे दास होने के पहले दाँव पर लगाया था या बाद में?" इस समय के वाद विवाद से उसकी विशाल बुद्धिमत्ता, संस्कारी रूप एवं अपने स्त्रीत्व का भरी सभा में किये अपमान होने पर क्रोधायमान स्त्री मन ही प्रगट होते हैं! जब कोई भी उसकी मदद नहीं करता तब उस दारुण प्रसंग में उसे सबसे अंत में यह ध्यान में आता है, कि मेरा सखा कृष्ण ही मेरा त्राता है! बाद में उसने कृष्ण को ही प्रश्न किया "हे घनश्याम, तुम पहले क्यों नहीं आए?" तब कृष्ण ने समर्पक उत्तर दिया "तुमने मुझे जैसे ही बुलाया, मैं तुरंत ही आया!" द्यूतक्रीड़ा के समय धृतराष्ट्र के वरदान देने पर वह अपने पतियों को दास्यत्व से मुक्त करती है और अंतिम वर के रहने पर भी वह मांगती नहीं, क्योंकि उसे अपने पतियों के कर्तृत्व पर गहरा विश्वास होता है! आवश्यक न होते हुए भी इस पतिव्रता ने अपने पतियों के साथ बारह वर्षों का वनवास और तेरहवे वर्ष में अज्ञातवास की पीड़ा सही| द्यूतक्रीड़ा के पश्चात १२ वर्ष के वनवास और १ वर्ष के अज्ञातवास में जाज्वल्य अग्निशिखा का साक्षात् रूप धारण कर द्रौपदी ने अपने सशक्त और दृढ़निश्चयी व्यक्तित्व का परिचय देते हुए पंचपांडवों के पौरुष और पराक्रम को सदैव धधकते रखा! इसमें दो प्रसंग इस अग्निशिखा का परिचय देते हैं| वनवास में उसे अकेली देख कर जयद्रथ उसका हरण कर अपने रथ में भगा कर ले जा रहा था| लेकिन द्रौपदी ने जयद्रथ से कहा, "मेरे पराक्रमी पति आकर मुझे मुक्त करेंगे!" ठीक वहीं हुआ | भीम और अर्जुन ने जयद्रथ को परास्त किया| वे उसका वध करने वाले थे, लेकिन द्रौपदी ने सहिष्णुता दिखाकर कहा, "जयद्रथ को मारने पर दु:शला (१०० कौरवों और ५ पांडवों की इकलौती बहन) विधवा हो जाएगी, इसलिए इस दुष्ट को विद्रूप करके छोड़ दो!" अज्ञातवास में उसे मत्स्यदेश की महारानी सुदेष्णा की सेविका (सैरंध्री) का रूप लेकर रहना पड़ा, इसी काल में उसने कीचक की कामुक नजर का सामना किया, और भीम के हाथों कीचकवध भी करवाया, वह भी अज्ञातवास के कठोर नियमों को सुरक्षित रखकर!

कुरुक्षेत्र के युद्ध में पांडवों की विजय तो हुई, परन्तु लाखों वीर योद्धाओं समेत द्रौपदी के पिता, बंधु और पांचो ही पुत्र इस युद्ध में वीरगति को प्राप्त हुए! द्रौपदी की जीवन यात्रा देखने पर ऐसा प्रतीत होता है कि यह अपने लक्ष्य को साध्य करने में यशस्वी हुई अत्यंत तेजस्वी विद्युत शलाका ही है|

क्रमश:.........





ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# सोनेरी क्षणाचे सोबती.....



ज्योतिर्मय साहित्य

व्यासपीठावर बसलेल्या डॉ. राजेंद्रप्रसादांची नजर रांगेतील एका खुर्चीकडे वारंवार जात होती.

चटकन उठावं, व्यासपीठाच्या पाय-या उतरून पहिल्या रांगेतल्या त्या खुर्चीपर्यंत जावं, त्या खुर्चीवर बसलेल्या त्या तपस्वी महर्षीला वाकून वंदन करावं असं त्यांच्या मनात पुनःपुन्हा येत होतं.

पण हे करण्यासाठी नेमका कोणता क्षण पकडावा, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते.

त्या समारंभात कुठलाही व्यत्यय न येता राष्ट्रपतीपदाची प्रतिष्ठा सांभाळून त्यांना हे सारं करायचं होतं.

समारंभ होता पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात. महाविद्यालयाने ७५ वर्षांची वाटचाल पूर्ण केल्याबद्दल एक मोठा समारंभ आयोजित केला होता, त्यासाठी भारताचे राष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. राजेंद्रप्रसाद भाषणासाठी उठले. पण ते जेव्हा माईककडे न जाता, व्यासपीठाच्या पाय-या उतरू लागले तेव्हा मात्र सारेच बुचकळ्यात पडले. राष्ट्रपती खाली उतरले. चालत चालत पहिल्या रांगेतल्या त्या विशिष्ट खुर्चीपर्यंत गेले आणि तिथे बसलेल्या त्या वयोवृद्ध व्यक्तीला वाकून नमस्कार केला त्यांनी!

ती व्यक्ती कोण आहे, हे तिथे हजर असलेल्या प्रत्येकाला माहित असल्यानं, तमाम पुणेकर जनतेने राष्ट्रपतींच्या या कृतीला पुन्हा एकदा प्रचंड टाळ्यांचा गजर करून मनमुराद दाद दिली. कारण, *ती व्यक्ती म्हणजे दुसरं तिसरं कुणीही नव्हतं तर साक्षात अण्णा होते. अण्णा म्हणजेच महर्षी धोंडो केशव कर्वे!

खरेखुरे क्रियाशील सुधारक! महर्षी कर्वे म्हणजे सेवामूर्ती. वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर हा आधुनिक व्यास आपल्या शिक्षण संस्थांना देणग्या मिळवण्यासाठी इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान या देशाच्या दौ-यावर निघाला होता आगबोटीच्या खडतर प्रवासाने. हे पाहिलं की त्यांचं शिक्षण-प्रेम आणि सामाजिक सुधारणां बद्दलची त्यांची तळमळ लक्षात येते. *खरंतर महर्षी कर्वे केवळ वाचाळवीर नव्हते तर ते कर्मवीर होते.

आधी केले मग सांगितले या न्यायाने त्यांनी आधी एका विधवेशी विवाह केला आणि मगच समाजाचा प्रचंड विरोध पत्करूनही विधवा विवाहासाठी विचार जागृतीचे अभियान चालू केले.

महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणा-या या महर्षीने पित्याच्या वात्सल्याने आपल्या प्रत्येक शिक्षण संस्थेचे भरण-पोषण केले होते.

फर्ग्युसन कॉलेजात लो.टिळक गणिताचे अध्यापन करीत असत. चळवळींमुळे त्यांना फर्ग्युसन कॉलेज मधून बाजूला व्हावे लागले, तेव्हा ती जागा महर्षी कर्वेंना मिळाली. *टिळकांचा वारस म्हणून कर्वे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सलग २३ वर्ष गणिताचं अध्यापन केलं.* पुण्यातल्या एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे ते संकल्पक, संस्थापक, संघटक होते, आपल्या शिक्षण संस्थांवर अण्णांची किती प्रचंड माया होती आणि त्या संस्थांच्या उभारणी साठी केवढी धडपड करीत होते ते पुढील प्रसंगावरून लक्षात येते.

सुप्रसिद्ध उद्योगपती सर विठ्ठलदास ठाकरसी यांना भेटून काही देणगी मिळतेय कां हे पाहण्यासाठी महर्षी एकदा त्यांच्या पुण्यातल्या बंगल्यावर गेले होते. पायी चालत. पर्वतीच्या बाजूला त्यांचा बंगला.

पण त्या काळात १०-१५ किलोमीटर चालण्याचं कर्वे यांना काहीच वाटत नसे.

अगदी एक रुपया जरी देणगी मिळणार असेल, तर अण्णा ५-६ मैल जाऊन तो रुपया घ्यायला तयार असत!!

संस्था उभ्या राहतात, त्या अशा भगीरथांमुळे!

ठाकरसींना अण्णा भेटले, चर्चा झाली. ठाकरसींनी सुरुवातीला एक लाख देण्याचे आश्वासन तर दिलेच, पण पुढे अधिकाधिक देणगी देण्याचा संकल्पही व्यक्त केला.

अण्णांना खूप बरं वाटलं!

खुश होऊन ते परत निघाले. ठाकरसी म्हणाले, ''कसे जाणार परत घरी ''

''चालत''!! अण्णा म्हणाले.

''म्हणजे? आलात कसे अण्णा?'' ठाकरसींना विचारलं..

''कसे म्हणजे? चालतच आलोय मी?'' अण्णांच हे उत्तर ऐकून ठाकरसी अवाकच झाले. *सात-आठ मैल चालत आलेले अण्णा पुन्हा सात-आठ मैल, भर उन्हात चालत जाणार होते!*

''नाही नाही अण्णा, तुम्ही चालत जाउ नका, हे दोन रुपये घ्या आणि टांग्याने घरी जा!'' ठाकरसींनी बजावले.

'' बरं ! बरं ! ''




असं म्हणून अण्णा उठले आणि बाहेर पडले. पण ठाकरसींना चैन पडेना.

*एकेका रूपयासाठी धडपडणारे अण्णा टांग्यासाठी दिलेले दोन रूपये सुद्धा संस्थेच्या मदत निधीत भरतील आणि स्वतः चालत जातील,* असं त्यांना राहून राहून वाटत होतं! म्हणूनच त्यांनी ड्रायव्हरला बोलावले आपल्या आणि त्याला सांगितले,

'' पटकन जा, आत्ता जे गृहस्थ आपल्या बंगलयातून बाहेर पडलेत, ते टांग्याने जात असतील तर परत ये. पण जर ते चालत जातांना दिसले, तर त्यांना आपल्या गाडीतून एरंडवण्याला सोडून ये.''

ड्रायव्हरने लगबगीने गाडी काढली, रस्त्यावर आणली. थोडेसे अंतर जातो न जातो, तोच त्याला दिसलं, *अण्णांची कृश मूर्ती रस्त्यावरून सावकाश चालत एरंडवण्याकडे निघाली होती !*

मला सांगा, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद अशा ऋषितुल्य व्यक्तीला खुर्चीवरून उठून व्यासपीठ सोडून नमस्कार करायला आले तर त्यात नवल ते कसलं !

त्यावेळी महर्षी कर्वे याचं वय होतं १०१ वर्षे!! नुकताच त्यांना ''भारतरत्न'' पुरस्कार मिळाला होता. बर्लिन मध्ये साक्षात आईनस्टाईनला भेटणारा हा पहिला महाराष्ट्रीयन महापुरूष!!...

चला तर या महान शिक्षणसम्राटाला आपण मानाचा मुजरा करूया.

***

# 'एआय उपयुक्त, पण मानवी भावना आणि सर्जनशीलतेला पर्याय नाही'

## 'टेक वारी २.०' कार्यक्रमातील 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' परिसंवादात मान्यवरांचे मत

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई - कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही कला, चित्रपटसृष्टी तसेच सर्वच क्षेत्रासाठी उपयुक्त तांत्रिक साधन असले, तरी मानवी भावना, संवेदना आणि सर्जनशीलतेची जागा ती कधीच घेऊ शकत नाही, असा सूर मंत्रालयात आयोजित 'टेक वारी २.०' कार्यक्रमातील 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' या परिसंवादात उमटला. कला, चित्रपट आणि शिल्पकलेतील मान्यवरांनी एआयच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना तंत्रज्ञानाचा वापर सजगतेने आणि विचारपूर्वक करण्याची गरज अधोरेखित केली.

सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित 'टेक वारी २.०' अंतर्गत 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात काळा घोडा आर्ट्स फ स्टिव्हलच्या संस्थापक आणि कलाकार बृंदा मिलर, शिल्पकार अरझान खंबाटा, चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी आणि ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होत्या.




काळा घोडा फेस्टिव्हलच्या आयोजक तथा संस्थापक बृंदा मेलर म्हणाल्या की, गेली २७ वर्ष काळा घोडा फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते आहे. या फ स्टीव्हलमध्ये सातत्यता असल्यामुळेच हा फेस्टिव्हल यशस्वी आहे. कोणत्याही खाजगी फेस्टिव्हलला जर शासनाचा पाठिंबा मिळाला तर ते काम चांगले यशस्वी होते हेच काळाघोडा फेस्टिव्हलचे यश आहे. सुरूवातीला या फेस्टिव्हलला मर्यादा होती. आता फेस्टिव्हल शासनाच्या मदतीमुळे चांगला होत आहे याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले.

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी चित्रपट क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ प्रवासातील बदलत्या तंत्रज्ञानाचा अनुभव कथन केला. सुरुवातीच्या काळात चित्रपटांमध्ये ॲनिमेशनचा वापर का करत नाही, असा प्रश्न विचारला जात असे. त्यानंतर त्यांनी स्वतःचे प्रशिक्षण केंद्र सुरू करून नवोदित कलाकारांना संधी दिली. ''कलाकाराला शिखरापर्यंत पोहोचण्यापासून रोखणारे वारे, यशानंतर त्याच कलाकाराच्या पावलांवर डोकं टेकवतात,'' असे सांगत त्यांनी कलाकारांच्या संघर्षाचे वास्तव मांडले. एआयवर आधारित चित्रपटांच्या वाढत्या वापराबाबत बोलताना कौल म्हणाले, ''चित्रपट हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी भावनांचे माध्यम आहे. संवेदना आणि भावनिक स्पर्श नसलेला चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकत नाही. आज वेळ वाचवण्यासाठी अनेक शॉर्टकट वापरले जात आहेत; मात्र चित्रपट हा विविध कलांचा संगम असल्याने त्यामध्ये मानवी स्पंदन टिकणे अत्यावश्यक आहे.''

चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी यांनी एआयला चित्रपटसृष्टीसमोरील नवे आव्हान मानले. ''प्रत्येक काळात चित्रपट क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहिली आणि ती काळानुसार बदलत गेली. एआयचा वापर वाढत असला, तरी मानवी कौशल्य आणि सर्जनशीलतेचे महत्त्व कायम राहणार आहे,'' असे ते म्हणाले. मुंबई ही देशाची चित्रपट राजधानी म्हणून अधिक सक्षम व्हावी, यासाठी चित्रपट क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मिती वाढवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

शिल्पकार अरझान खंबाटा यांनी सार्वजनिक कलेचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. ''पब्लिक आर्ट म्हणजे समाजाला कलेशी जोडणारा एक भक्कम दुवा आहे. धातू, दगड, काच यांपासून बनवलेली भव्य शिल्पे, भित्तीचित्रे, लाईट इन्स्टॉलेशन्स आणि स्मारके समाजाच्या सांस्कृतिक जाणिवा समृद्ध करतात,'' असे ते म्हणाले. शिल्पकलेतही एआयचा वापर वाढत असला, तरी आयकॉनिक कलाकृती निर्माण करण्यासाठी कलाकाराची स्वतंत्र दृष्टी आणि संवेदनशीलता महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. परिसंवादात सहभागी मान्यवरांनी एआयचा वापर करताना अत्यंत सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता व्यक्त केली. ''एआय मदत करू शकते; मात्र त्याचा वापर कधी, कसा आणि किती करायचा याचे भान असणे आवश्यक आहे. पूर्णपणे एआयवर अवलंबून राहिलो, तर कला आणि चित्रपट यांचे मूळ अस्तित्व धोक्यात येऊ शकते,'' अशी भूमिका त्यांनी मांडली.






# एक पानाचा प्रस्ताव खरेच वादळ थांबविणार?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

प्रस्तावित एक पान योजना मोठी अद्भुत आहे, त्यातील तपशिलाचा विचार करता युद्ध समाप्त करण्याच्या आणि भविष्यातील अनुविषयक वाटाघाटीसाठी एक सकारात्मक चौकट निश्चित करण्याच्या उद्दिष्टानुसार एक पान दस्तऐवज म्हणून त्याचे वर्णन करण्यात येत आहे. त्यामध्ये एका पानावर १४ कलमांचा सामंजस्य करार करण्यावर भर दिला आहे. त्यातील प्रमुख तरतुदीनुसार अणुऊर्जा स्थगिती हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे इराण उच्चस्तरीय अणुऊर्जा संवर्धन थांबविण्यासाठी वचनबद्ध झाला आहे. दुसरे म्हणजे निर्बंध शिथिलतेवर अमेरिका तयार झाली आहे. अमेरिका इराण वरील निर्बंध उठविण्यासाठी आणि गोठवलेले अब्जावधी डॉलर्सचे इराणी भांडवल निधी सोडण्यास सहमत झाली आहे. तिसरे म्हणजे हार्मुजच्या समुद्रधुनी बाबत दोन्ही बाजूने जहाज वाहतुकीवर असलेले निर्बंध हटवून फॉर्म समुद्रधुनी पुन्हा खुली करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. नुकसान भरपाई आणि सुरक्षा याबाबतीत प्राप्त तथ्यानुसार या योजनेत नुकसान भरपाईतील वाटाघाटी अमेरिकेची नाकेबंदी हटविणे आणि नवीन सुरक्षा यंत्रणा विकसित करणे यांचा समावेश आहे.

वाटाघाटी प्रक्रियेचा विचार करता पाकिस्तान तुर्की आणि इजिप्त मधील मध्यस्तांच्या मदतीने प्रस्तावावर वाटाघाटी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ट्रम्प यांचे दूत स्टीव विटकॉफ आणि इराणी अधिकाऱ्याच्या अधिकाऱ्यांची



देवाणघेवाण प्रक्रिया समाविष्ट होती. अमेरिकेने प्रोजेक्ट फ्रीडम या प्रकल्पाला स्थगिती देण्याचे मान्य केले आहे या प्रकल्पाचा एक भाग म्हणून अध्यक्ष ट्रम्प यांनी टूथ सोशल वर घोषणा केली आहे की कराराला अंतिम स्वरूपात आकार देता येतो की नाही हे पाहण्यासाठी ते प्रोजेक्ट फ्रीडम नावाची अमेरिकेची नौदल लष्करी मोहीम तूर्त थांबवित आहेत.

एक पानाचा प्रस्ताव म्हणजे १४ कलमांचे कडबोळे आहे त्यामध्ये दोन्ही बाजूंनी मधाचे बोट दाखवले आहे हा ऊन सावल्यांचा खेळ आहे कोण तळ्यात कोण मळ्यात हे सांगता येत नाही.

भविष्यातील अणुविषयक वाटाघाटी साठी चौकट निश्चित करण्याच्या उद्देशाने एक पानाचे दस्तऐवज म्हणून वर्णन केलेला १४ कलमी सामंजस्य करार १४ कलमी तरतुदी अणुऊर्जा स्थगिती इराण उच्चस्तरी अणुऊर्जा संवर्धन थांबवण्यास वचनबद्ध आहे निर्बंध शिथिलता अमेरिका निर्बंध उठवण्यास आणि गोठवलेला अब्जावधी डॉलर्सचा इराणी निधी सोडण्यास सहमत आहे समुद्रधुनी दोन्ही बाजूंनी जहाज वाहतुकीवरील निर्बंध हटवून होरमुरेची सामुद्रधुनी पुन्हा खुली प्रस्ताव स्वागतार्ह आहे एक पान प्रस्तावाचे हे खरे गमक आहे.

समारोप

इराण आणि डोनाल्ड ट्रम्प एक पान प्रस्तावना बाबत सहमत होत आहेत, त्यामुळे युद्ध खरोखरच थांबेल काय हा खरा प्रश्न आहे? एक पान प्रस्तावामुळे साऱ्या जगाने युद्ध थांबत आहे म्हणून सुस्कारा टाकला आहे

भारताचा आरंभापासूनच आग्रह होता की लढू नका उचतगिरी आणि कुठे नीतीने प्रश्न सोडवा संवाद साधा आणि बोलणी करून एकत्र या प्रश्न सोडवा हा आग्रह अखेर दोन्ही पक्षाला मान्य करावा लागला आणि आता दोघेही जवळ आले आहेत ही एक समाधानाची गोष्ट आहे. या सर्व चर्चेचे सार असे आहे की भांडणारे इराण इजरायल आणि अमेरिका व इराण आता एकत्र आले आहेत, जवळ येत आहेत. संघर्ष सुरू झाल्यापासून प्रथमच दोन्ही पक्ष कराराच्या दृष्टीने जवळ आले आहेत ही गोष्ट समाधानाची आहे दोन्ही पक्ष इतके जवळ कधीच आले नव्हते ते आता जवळ येत आहेत याची समाधान वाटते परंतु प्रश्न अजूनही कायम आहे इराण अमेरिका किती जवळ किती दूर खरोखरच एक पानाचा प्रस्ताव चहाच्या पेल्यातले वादळ तर ठरणार नाही ना ही वादळापूर्वीची शांतता तर नाही ना हा खरा प्रश्न पडतो काही हो बरे झाले तिसरे महायुद्ध टळले म्हणून जग आज सुखाने झोपणार आहे.






हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559